आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ जानेवारी २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- भारत विस्तारवाद नाही, तर विकासवादाच्या दिशेनं काम करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन /मुंबईत नौदलाच्या सुरत, नीलगिरी या नौकांचं आणि वाघशीर या पाणबुडीचं केलं राष्ट्रार्पण
- दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती यून सुक येओल यांना अटक
- झिया चॅरिटेबल ट्रस्ट भ्रष्टाचार प्रकरणात बांगलादेशाच्या माजी प्रधानमंत्री बेगम खालिदा झिया यांची सर्वोच्च न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात आयर्लंडला ३०४ धावांनी पराभूत करत भारताचा ३-० असा मालिकाविजय, प्रतिका रावल आणि स्मृती मंधाना यांची शतकं

**<><><><><>**

भारत विस्तारवाद नाही, तर विकासवादाच्या दिशेनं काम करत आहे. भारतानं खुल्या, सुरक्षित, समावेशक आणि समृद्ध भारत-प्रशांत क्षेत्राचं नेहमीच समर्थन केलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज मुंबईत नौदलाच्या गोदीत सुरत आणि नीलगिरी या युद्धनौका, तसंच वाघशीर ही पाणबुडी नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट केल्यानंतर बोलत होते. नौदलाच्या ताफ्यात एकाच वेळी एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी समाविष्ट होण्याची ही पहिलीच वेळ आहे. यामुळं भारताची सुरक्षा आणि प्रगतीला नवीन सामर्थ्य मिळेल असं ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची स्थापना केली, त्याच पवित्र भूमीवर २१व्या शतकात नौदलाला बळकटी देण्याच्या दिशेनं हे खूप मोठं पाऊल असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं.....

**होल्ड... बाइट--- प्रधानमंत्री**

गेल्या १० वर्षांत भारताच्या तिन्ही सशस्त्र दलांनी आत्मनिर्भरतेचा मंत्र अवलंबला आहे, त्याचं त्यांनी कौतुक केलं. सर्वांच्या सहकार्यानं लवकरच संरक्षण क्षेत्राचा कायापालट होईल, संकटकाळात इतर देशांवरचं भारताचं अवलंबित्व कमी करणं, रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करणं यामुळे शक्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वाढवण बंदराला मंजुरी, सीमावर्ती भागांमध्ये वाढती जोडणी, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रमाचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भविष्यात अवकाश आणि खोल समुद्र या दोन क्षेत्रांचं महत्त्व खूप वाढणार असून त्या क्षेत्रात भारताची ताकद वाढवण्याचं काम सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

भारत-प्रशांत क्षेत्र भारतासाठी ऐतिहासिक काळापासून महत्त्वाचं आहे, त्यामुळे या क्षेत्रात सशक्त नौदल असण्याला देशाच्या दृष्टीनं मोठं प्राधान्य आहे. ते साध्य करण्याच्या दृष्टीनं या तीन नौकांचा नौदलात समावेश हा महत्वाचा टप्पा असल्याचं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं.

भारतीय नौदलाच्या वेगवान कामामुळेच भारत-प्रशांत क्षेत्रातली सागरी सुरक्षा कायम ठेवण्यात यश आलं आहे, असं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी म्हणाले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज झालं. अध्यात्म हा आपल्या संस्कृतीचा गाभा असून, मानवतेची सेवा हे या अध्यात्मिक संस्कृतीचं मूळ आहे. आणि याच धारणेतून केंद्र सरकारनं आयुष्मान भारत, हर घर जल, उज्ज्वला योजना इत्यादी कार्यक्रम राबवले आहेत,असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

<><><><>

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आज लष्कर दिन साजरा करण्यात आला.

लष्कर दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लष्करातले जवान आणि ज्येष्ठ तसंच निवृत्त सैन्य अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिक देशाच्या प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी योगदान देतात, असं मुर्मू यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लष्कर दिनानिमित्त सैनिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दृढनिश्चयाच्या बळावर भारतीय लष्कराने सदैव देशाचं संरक्षण केलं आहे. सैन्य दलांमध्ये विविध सुधारणा तसंच आधुनिकीकरणाला सरकार प्राधान्य देत असल्याच त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

लष्कर दिन हा फक्त एका दिवसाचा कार्यक्रम नाही, तर वर्षाचे ३६५ दिवस, डोळ्यात तेल घालून देशाचं रक्षण करणाऱ्या लष्कराच्या जवानांचे आहेत, असं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ७७व्या लष्कर दिनाचं मुख्य

संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर झालं, त्यावेळी गौरवगाथा या कार्यक्रमात ते बोलत होते.

तत्पूर्वी, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मानवंदना स्वीकारली. लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र छात्रसेनेच्या महिला पथकाचा संचलनात सहभाग होता. प्रथमच नेपाळचा लष्करी वाद्यवृंदही या कार्यक्रमात सहभागी झाला होता.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी १९ तारखेला आकाशवाणीवर 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११८वा भाग असेल. त्यासाठी आपल्या सूचना आणि कल्पना पाठवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. 1800-11-7800 या टोल फ्री क्रमांकाबरोबर मायजीओव्ही आणि नमो ॲपवरुनही संपर्क साधता येईल.

<><><><><>

दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती यून सुक येओल यांना पोलिसांनी आज अटक केली. त्यानंतर येओल यांना ग्योंगगी प्रांतातल्या ग्वानचेओन इथल्या तपास कार्यालयात नेण्यात आलं आहे. गेल्या महिन्यात त्यांनी  मार्शल लॉ जारी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्यांच्यावर नॅशनल असेंब्लीमध्ये महाभियोग प्रस्ताव मंजूर झाला होता. त्यांच्याविरुद्धच्या राष्ट्रद्रोहाच्या आरोपांची अद्याप चौकशी सुरू असून दक्षिण कोरियात राष्ट्रपतींना अटक होण्याची ही पहिली वेळ आहे.

<><><><><>

झिया चॅरिटेबल ट्रस्ट भ्रष्टाचार प्रकरणात आज बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयानं बांगलादेशच्या माजी प्रधानमंत्री बेगम खालिदा झिया, त्यांचा मुलगा

तारिक रहमान आणि इतरांची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात उच्च न्यायालयानं त्यांना दोषी ठरवून शिक्षा ठोठावली होती. उच्च न्यायालयानं त्यांच्या पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा वाढवून ती दहा वर्षांची केली. ती सर्वोच्च न्यायालयानं रद्द केली आहे. खालिदा यांना सूडभावनेनं या प्रकरणात गोवण्यात आल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे राजकोट इथं झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं आयर्लंडला ३०४ धावांनी पराभूत करत या मालिकेत ३-० असा निर्भेळ विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ५ गड्यांच्या मोबदल्यात ४३५ धावा केल्या. सलामीवीर प्रतिका रावल आणि स्मृती मंधाना या दोघींनी शतकं ठोकली. प्रतिकानं १५४, तर मंधानानं ८० चेंडूत १३५ धावा केल्या. या दोघींनी पहिल्या गड्यासाठी २३३ धावांची भागिदारी करत भारताच्या विजयाचा पाया रोवला. अवघ्या ७० चेंडूत स्मृतीनं आज आपलं शतक पूर्ण केलं. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात याआधी हरमनप्रीत कौरनं ८७ चेंडूत शतक झळकावलं होतं. तिचा विक्रम आज स्मृतीनं मोडला. ऋचा घोषनं ५९ धावांचं योगदान दिलं.

विजयासाठी ४३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंडचा संघ ३२ व्या षटकातच १३१ धावात गारद झाला. दिप्ती शर्मानं ३, तनूजा कंवरनं २, तर तितास साधू, सायली सातघरे, आणि मिन्नू मणी यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

प्रतिका रावल या सामन्यातली, तसंच मालिकेतलीही, सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

<><><><><>

इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरी प्रकारात भारताच्या अनुपमा उपाध्याय हिने उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने उपांत्यपूर्व फेरीत भारताच्याच रक्षिता रामराज हिचा २१-१७, २१-१८ असा सरळ गेममध्ये पराभव केला. भारताच्या मालविका बनसोड आणि आकर्शी कश्यप तर पुरुष एकेरीत भारताचे प्रियांशू राजावत आणि एच. एस. प्रणॉय यांचं आव्हान संपुष्टात आलं आहे.